आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता

२ ऑगस्ट २०२४ - शुक्रवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या अध्यक्षतेखाली राष्ट्रपती भवन इथं देशभरातल्या सर्व राज्यपालांची दोन दिवसीय परिषद सुरु

- नीट युजी पेपरफुटी प्रकरणात सीबीआयनं केलं १३ आरोपींच्या विरोधात पहिलं आरोपपत्र दाखल

- जुलै महिन्यात देशभरात युपीआयद्वारे होणाऱ्या व्यवहारांनी गाठला २० लाख ६४ हजार कोटी रुपयांचा टप्पा

- उत्तराखंडमध्ये केदारनाथ यात्रेच्या मार्गावर दरड कोसळल्यामुळे यात्रा तात्पुरती स्थगित

**आणि**

- पॅरिसमध्ये बॅडमिंटन नेमबाजी हॉकीसह विविध स्पर्धांमधील भारतीय खेळाडूंच्या कामगिरीकडे देशाचं लक्ष

**<><><><><>**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या अध्यक्षतेखाली आज नवी दिल्लीत राष्ट्रपती भवन इथं देशभरातल्या सर्व राज्यपालांची परिषद होत आहे. राष्ट्रपतींच्या अध्यक्षतेखाली होणारी ही पहिलीच परिषद आहे. या परिषदेला उपराष्ट्रपती, प्रधानमंत्री यांच्यासह केंद्रीय मंत्री, नीती आयोगाचे उपाध्यक्ष, मुख्य कार्यकारी अधिकारी आणि मंत्रालयातले वरिष्ठ अधिकारी देखील उपस्थित राहणार आहेत.

या दोन दिवसीय परिषदेत तीन फौजदारी कायद्यांची अंमलबजावणी, उच्च

शिक्षणात सुधारणा आणि विद्यापीठांची मान्यता, आदिवासी क्षेत्र, आकांक्षी जिल्हे आणि ब्लॉक्स, सीमावर्ती भाग यासारख्या केंद्रित क्षेत्रांचा विकास याविषयावर विचारविनिमय होणार आहे. त्याचप्रमाणे ‘मायभारत’, ‘एक भारत श्रेष्ठ भारत’ आणि ‘एक पेड माँ के नाम’ तसंच नैसर्गिक शेती या मोहिमांमध्ये राज्यपालांची भूमिका; राज्यातल्या विविध केंद्रीय संस्थांमध्ये उत्तम समन्वय साधण्यात राज्यपालांचं योगदान या मुद्द्यांचा समावेश आहे.

**<><><><><>**

खोट्या बातम्या आणि दिशाभूल करणारी माहिती ही समाजातली अपप्रवृत्ती असून तिला वेळीच आळा घालणं अत्यावश्यक आहे, असं केंद्रीय माहिती आणि प्रसारण राज्यमंत्री डॉ एल मुरुगन यांनी आज राज्यसभेत सांगितलं. या संदर्भातल्या पुरवणी प्रश्नाला उत्तर देताना ते बोलत होते. माहिती आणि प्रसारण मंत्रालयाच्या पत्र सूचना कार्यालयाअंतर्गत २०१९ मध्ये सुरु केलेल्या तथ्य तपासणी विभागानं आतापर्यंत ९ हजार ९२२ संदेश बनावट बातम्या म्हणून उघड केले आहेत. असं त्यांनी सांगितलं. केंद्र सरकारशी संबंधित कोणत्याही बातम्यांची शहानिशा करून त्या खऱ्या आहेत की खोट्या हे केवळ सरकारच ठरवू शकतं असं केंद्रीय माहिती आणि प्रसारणमंत्री अश्विनी वैष्णव यांनी या चर्चेदरम्यान सांगितलं तर प्रसारमाध्यमं हा लोकशाहीचा चौथा स्तंभ असल्याचं राज्यसभेचे सभापती, उपराष्ट्रपती जगदीप धनखड म्हणाले.

**<><><><><>**

नीट युजी पेपरफुटी प्रकरणात सीबीआयनं काल बिहारमध्ये १३ आरोपींच्या विरोधात पहिलं आरोपपत्र दाखल केलं. या आरोपपत्रात पेपरफुटी प्रकरणातले

मुख्य सूत्रधार मनिष प्रकाश, सिकंदर यादवेंदु आणि इतर ११ जणांनर विविध कलमांतर्गत गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. नीट युजी पेपरफुटी प्रकरणात बिहार पोलिसांच्या आर्थिक गुन्हे शाखेनं आंतर राज्य टोळीचा छडा लावला होता. या प्रकरणात आतापर्यंत ४० जणांना अटक झाली असून ते पोलीस किंवा न्यायालयीन कोठडीत आहेत. या प्रकरणी पुढला तपास सुरु आहे.

<><><><><>

यंदाच्या जुलै महिन्यात देशभरात युपीआय आधारित व्यवहारांमध्ये वाढ होऊन ते २० लाख ६४ हजार कोटी रुपयांवर पोहोचल्याचं नॅशनल पेमेंट्स कॉर्पोरेशन ऑफ इंडियाने काल जारी केलेल्या आकडेवारीत म्हटलं आहे. युपीआय द्वारे केल्या जाणाऱ्या व्यवहारांमध्ये दर वर्षी ३५ टक्के वाढ होत असल्याचं यात म्हटलं आहे.

जुलैमध्ये एकूण युपीआय व्यवहारांची संख्या जवळजवळ ४ टक्के वाढून १४ अब्ज ४४ कोटींवर पोहोचली, तर दैनंदिनव्यवहारांचं सरासरी प्रमाण ४६६ दशलक्ष इतकं होतं.

युपीआय परदेशातल्या काही देशांमध्ये सुरु झाल्यामुळे, तसंच रूपे क्रेडिट कार्ड युपीआयशी जोडल्यामुळे दर महिन्याला जवळजवळ ६० लाख नवीन वापरकर्ते युपीआयशी जोडले जात असल्याचं यात म्हटलं आहे.

<><><><><>

पॅरिस ऑलिंपिक्समध्ये कांस्य पदक पटकावल्याबद्दल मध्य रेल्वेनं स्वप्निल

कुसळे याला बढती दिली आहे. पुणे विभागात तिकीट तपासणीस म्हणून कार्यरत असलेल्या स्वप्निलची बढती आता राजपत्रित अधिकाऱ्यांच्या गट ब श्रेणीमध्ये करण्यात आली आहे. मध्य रेल्वेच्या महाव्यवस्थापकांनी काल ही घोषणा केली.

**<><><><><>**

जीएसटी अर्थात वस्तू आणि सेवाकर संकलनात जुलै महिन्यात गेल्या महिन्याच्या तुलनेत १० पूर्णांक ३ शतांश टक्के वाढ झाली असून ते एक लाख ८२ हजार कोटी रुपयांवर पोहोचलं आहे. जुलै महिन्यात करदात्यांचे परतावे दिल्यानंतर वस्तू आणि सेवाकराचं निव्वळ संकलन एक लाख ६० हजार कोटी रुपये इतकं आहे, जे १४ पूर्णांक ४ दशांश टक्क्यांनी वाढलं आहे. वित्त मंत्रालयानं प्रसिद्ध केलेल्या आकडेवारीनुसार एकूण परताव्यांमध्ये १६ हजार २८३ कोटी रुपयांची घट झाली असून हे प्रमाण १९ पूर्णांक ४ दशांश टक्के इतकं आहे. देशांतर्गत व्यवहारांमध्ये वाढ हे वस्तू आणि सेवाकर महसूल संकलनातल्या वृद्धीचं मुख्य कारण आहे. याच काळात आयाती मधून मिळालेल्या महसुलात १४ पूर्णांक २ दशांश टक्के वाढ झाली असून ते ४८ हजार ३९ कोटी रुपये झालं आहे.

**<><><><><>**

उत्तराखंडमध्ये केदारनाथ यात्रेच्या मार्गावर दरड कोसळल्यामुळे यात्रा तात्पुरती स्थगित करण्यात आली आहे. काल रात्री झालेल्या मुसळधार पावसामुळे राज्यातले रस्ते, पूल, विजेच्या तारा आणि पाणीपुरवठा वाहिन्यांचं तसंच शेतजमिनींचं मोठं नुकसान झालं आहे.

एसडीआरएफ, एनडीआरएफ, डीडीआरएफ, स्थानिक पोलीस आणि जिल्हा

प्रशासनाने एकत्रितपणे राबवलेल्या बचाव मोहिमेत केदारनाथ यात्रेच्या मार्गावर अडकलेल्या २ हजाराहून जास्त यात्रेकरूंना सुरक्षित ठिकाणी हलवलं आहे. वायुसेनेच्या विमानांनी भिंबली, रामबाडा आणि लिंचोली इथून अंदाजे ४२५ जणांची सुटका केली, तर सोनप्रयाग आणि भिंबली दरम्यानच्या ११ शे यात्रेकरूंना काल सुरक्षित ठिकाणी हलवण्यात आलं.

उत्तराखंडचे मुख्यमंत्री पुष्कर सिंह धामी यांनी आपत्तीग्रस्त भागाची हवाई पाहणी करून संबंधित यंत्रणांकडून प्रत्यक्ष मदत कार्याचा आढावा घेतला.

**<><><><><>**

केरळमध्ये वायनाड इथं भूस्खलन झालेल्या भागात बचाव मोहीम युद्ध पातळीवर सुरु आहे. चुरनमाला इथल्या ओढ्यावर काल उभारण्यात आलेल्या १९० फूट लांबीच्या पुलावरून आज सकाळी भूस्खलनग्रस्त भागात बचाव पथकं आणि यंत्रसामुग्रीची वाहतूक सुरु झाली.

भारतीय हवाई दलाची हेलिकॉप्टर्स सक्रियपणे बचाव कार्यात सहभागी झाली असून, बचाव पथकं आणि मदत सामुग्रीची वाहतूक करत आहेत.

या आपत्तीमधल्या मृतांची संख्या २८१ वर पोहोचली असून जखमी झालेल्या १८० पेक्षा जास्त लोकांवर उपचार सुरु आहेत. १७० जण अद्याप बेपत्ता आहेत. जिल्ह्यातल्या ७० मदत छावण्यांमध्ये ७ हजाराहून जास्त नागरिकांना हलवण्यात आलं आहे.

**<><><><><>**

इस्त्रायलमध्ये अमेरिकन लष्कर तैनात करण्यासंदर्भात अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष ज्यो बायडन यांनी काल इस्त्रायलचे प्रधानमंत्री बेंजामिन नेत्यन्याहू यांच्याशी दूरध्वनीवरुन चर्चा केली. इस्त्रायलवर हल्ले करण्याची धमकी इराणने दिली होती.

या पार्श्वभूमीवर ही चर्चा झाली. इराण किंवा हमासच्या संभाव्य हल्ल्यांच्या पार्श्वभूमीवर इस्रायलला सर्वतोपरी मदत करण्यासाठी अमेरिका कटीबद्ध असल्याचं व्हाईट हाऊसनं जारी केलेल्या पत्रकात म्हटलं आहे.

**<><><><><>**

नायजेरियाच्या ईशान्येकडील बोर्नो राज्यातील एका स्थानिक बाजारात काल रात्री झालेल्या स्फोटात २० जण ठार झाले असून अनेकजण जखमी झाले आहेत. स्फोटानंतर  या भागात गोळीबार करण्यात आल्याची माहिती बोर्नो पोलिसांनी दिली आहे. बोको हराम दहशतवादी गटानं हा स्फोट घडवून आणल्याचंही पोलिसांनी म्हटलं आहे. बोर्नो राज्यातल्या कोंडाउगा शहरातल्या कापुरी येथील बाजारात हा स्फोट झाला. त्यानंतर  पोलिसांनी संपूर्ण राज्यात संचारबंदी घोषित केली आहे.

**<><><><><>**

पॅरिस ऑलिंपिक्सच्या आजच्या सातव्या दिवशी भारतीय खेळाडू बँडमिंटन, २५ मिटर पिस्तुल. हॉकी, ज्यूडो तसचं जलतरण स्पर्धेत सहभागी होत आहे. पुरुषांच्या एकेरी बॅडमिंटन स्पर्धेत भारताच्या लक्ष्य सेनचा सामना चीन तैपैईच्या चाऊ तियेन चेन बरोबर होणार आहे. दोन कांस्य पदक पटकावणारी मनु भाकर आज २५ मिटर पिस्तुल नेमबाजी स्पर्धेत दाखल होत आहे. पुरुषांच्या हॉकी स्पर्धेत आज भारतीय संघाचा सामना ऑस्ट्रेलियन संघाबरोबर होणार आहे. भारतीय संघानं या आधीच उंपात्य पूर्व फेरीत प्रवेश केला आहे. ज्यूडोच्या ७८ किलो वजनी गटात आज भारताच्या तूलिका मान हिचा सामना क्यूबाच्या इडालिस ओरटिसपेरिस बरोबर होणार असून या स्पर्धेतील अंतिमसह सर्वच सामने आजच खेळवले जाणार आहेत. तिरदांजीच्या  संमिश्र सांघिक स्पर्धेत आज भारताची

धीरज बोमदेवरा आणि अंकिता भकत यांच्या जोडीचा सामना इंडोनेशियाच्या दायनन्द कोईरुनिसा आणि आरिफ पांगेस्तु यांच्याबरोबर होणार आहे. एथलेटिक्समधील आज होणाऱ्या महिलांच्या ५ हजार मिटर तर पुरुषांच्या गोळाफेक स्पर्धेत भारताचा तेजेंद्र पाल सिंह तूर  पात्रता फेरीत सहभागी होणार आहेत. भारतीय गोल्फ खेळाडू गगनजीत भुल्लर आणि शुभंकर शर्मा आणि जलतरण पटू नेथरा कुमानन तसचं विष्णू सर्वानन हे खेळाडूही संबंधित स्पर्धांमध्ये सहभागी होणार आहेत.

**//<><><><><>//**